**नियमित दिवाणी दावा क्र.२४४/२०२१ मधील नि.६४ खालील आदेश**
**(तुकाराम पुजारी व अन्य वि. समाधान ओलेकर वगैरे )**
**(CNR NO.MHSN080014312021)**

प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज गट क्र.८०७ मधील शासकीय रस्त्यावर पावसाळयाच्या काळात तात्पुरत्या स्वरुपात मुरुम टाकण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार, प्रस्तूत प्रकरणामध्ये न्यायालयाने नि.५ कडील आदेशान्वये नकाशातील शासकीय रस्ता वगळून उर्वरित क्षेत्रात कोणताही रस्ता करणेस अथवा मुरुम टाकणेस मनाई केलेली आहे. नकाशातील शासकीय रस्ता हा अनेक वर्षापासून बंद असल्याचे व वापरात नसल्याने प्रत्यक्ष जागेवर त्याची स्पष्ट ओळख होत नाही. सदरचा रस्ता हा काही ठिकाणी शेत जमिनीच्या कडेला सरकलेला आहे. सध्या पावसाळा सुरु होत असून रस्त्यावर मोठया प्रमाणावर चिखल निर्माण होवून ये-जा करणे अत्यंत कठीण होणार आहे. वादींच्या मागणीनुसार, वहिवाटीचा रस्ता प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना वापरण्यास न्यायालयाने मनाई केलेली आहे. त्यामुळे, वादीने तो रस्ता बंद केलेला आहे. अशा परिस्थितीत, गावातील शाळकरी मुले, शेतकरी व इतर ग्रामस्थ यांना मोठया अडचणींना तोंड दयावे लागत आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी मुरुमीकरणाचे काम हे केवळ गट क्र.८०७ मधील नकाशातील शासकीय रस्त्यापुरतेच मयादीत राहिल, वादीच्या खाजगी जमिनीत कोणतेही अतिक्रमण केले जाणार नाही, मुरुमीकरणाचे काम हे तात्पुरत्या स्वरुपाचे असून त्याबाबत दाव्याच्या अंतिम निकालावर कोणताही हक्क निर्माण करणार नाही व न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटींचे पालन करण्यात यईल अशी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी हमी दिलेली आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. वादी यांनी प्रस्तूत अर्जास त्यांचे म्हणणे नि.६६ कडे दाखल केलेले आहे. वादी यांच्या कथनानुसार, गट क्र.८०७ मधील सरकारी रस्त्याशी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा कोणताही वैयक्तिक संबंध नाही. प्रतिवादींना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस कोणताही अधिकार नाही. सरकारी रस्त्याशी संबंधित प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केलेला नाही. शासकीय रस्ता हा दावा मिळकतीचा भाग नाही. प्रतिवादी मागणी करीत असलेला रस्ता हा त्यांच्याच कथनानुसार अनेक वर्षापासून बंद असल्याने व तो वापरात नसल्याने त्याची ओळख प्रत्यक्ष जागेवर स्पष्ट होत नाही आणि त्यामुळे प्रत्यक्ष सरकारी मोजणी होवून जागेवर त्याची स्पष्टता होणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ हे राजकीय पाठबळ असलेले इसम असून ते वादीच्या दावा मिळकतीमध्ये तहसिलदार, जत यांच्या आदेशाचा आधार घेवून बेकायदेशीरपणे दोन रस्ते करण्याच्या प्रयत्नात असल्यामुळे, वादींनी त्यांच्याविरुध्द ताकीद अर्ज दाखल केला होता व तो मंजूर करणेत आलेला आहे. सदर आदेशाविरुध्द प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी सांगली येथील जिल्हा न्यायालयात किरकोळ दिवाणी अपील दाखल केले होते. दाखल केलेले अपील व त्या अनुषंगाने प्रतिवादी यांनी मा. ना. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दाखल केलेले रिट पिटीशन दोन्हीही फेटाळण्यात आलेले आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नसल्यामुळे तो खर्चासह फेटाळणेची विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांना युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

४. नि.क्र.२७ कडे दाखल करणेत आलेल्या दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादी क्र.१ व इतर यांचे विरुध्द मामलेदार कोर्ट कायदा कलम ५ अन्वये अतिक्रमण काढून मिळणेबाबतचा अर्ज असल्याचे दिसून येते.

सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांची शेत जमीन गट क्र.८११ मध्ये जाणे येणेसाठी जमीन गट क्र.८१७, ८१६ व ८०७ च्या जमीन मालकांनी अडवलेला रस्ता खुला करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सदरचा अर्ज तहसिलदार, जत यांनी दिनांक ०८.१०.२०२० रोजी मंजूर करुन मौजे रेवनाळ येथील शेत जमीन गट क्र.८०७, ८१६ व ८१७ मध्ये वहिवाटीचा बैलगाडी रस्ता व त्यावर केलेले अडथळे दूर करुन खुला करणेबाबत वादी व इतर यांना निर्देश दिलेले आहेत. तथापी, प्रस्तूत कामातील वादी यांनी नि.क्र.५ कडील अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ ते ५ व प्रतिवादी क्र.११ यांनी अथवा त्यांचे तर्फे इसमांनी दावा मिळकतीमध्ये येवून तहसिलदार, जत यांचे आदेशाचा गैरफायदा घेवून नव्याने रस्ता करु नये आणि मुरुम टाकून रस्ता कायमस्वरुपी पक्का करु नये तसेच वादीच्या दावा मिळकतीमधील वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अशी तुर्तातूर्त ताकीदीची मागणी केली होती. माझे पुर्वाधिकारी यांनी सदरचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादी क्र.१ ते ५ व प्रतिवादी क्र.११ अथवा त्यांचेतर्फे इसमांनी मौजे रेवनाळ, ता. जत येथील गट क्र.८०७ क्षेत्र ४हे-१४आर, पोट खराब ०हे-०६आर मधील नकाशाप्रमाणे असणाऱ्या सरकारी रस्त्याचे क्षेत्र वगळून उर्वरित मिळकतीवर असलेल्या वादींच्या कब्जेवहिवाटीस, विहित कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय, हरकत अथवा अडथळ करु नये अशी तुर्तातूर्त ताकीद दिलेली आहे. तसेच तहसिलदार, जत यांनी पारित केलेल्या दिनांक ०८.१०.२०२० रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी प्रतिवादी क्र.१ ते ५ व प्रतिवादी क्र.११ यांनी दाव्याच्या निकालापावेतो करु नये अशी देखील तुर्तातूर्त ताकीद दिलेली आहे.

५. जरी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांचे प्रस्तूत अर्जाद्वारे मुरुमीकरणाचे काम हे केवळ गट क्र.८०७ च्या नकाशातील शासकीय रस्त्यापुरतेच मयादीत राहिल, वादीच्या खाजगी जमिनीत कोणतेही अतिक्रमण केले जाणार नाही, मुरुमीकरणाचे काम

हे तात्पुरत्या स्वरुपाचे असून न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटींचे पालन करण्यास ते तयार आहेत अशी हमी दिली असली तरी, प्रतिवादी मागणी करीत असलेला रस्ता हा त्यांच्याच कथनानुसार अनेक वर्षापासून बंद असल्याने व तो वापरात नसल्याने त्याची ओळख प्रत्यक्ष जागेवर स्पष्ट होत नाही तसेच सदरचा रस्ता हा काही ठिकाणी शेत जमिनीच्या कडेला सरकलेला आहे आणि त्यामुळे प्रत्यक्ष सरकारी मोजणी होवून जागेवर त्याची स्पष्टता होणे गरजेचे असल्याचे प्रतिवादी यांचे स्वतःचे कथन आहे. वादी यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये घेतलेल्या आक्षेपाचे स्वरुप देखील त्याचप्रकारचे आहे. अशी परिस्थितीमध्ये, प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दाव्यामध्ये क्लीष्टता निर्माण होणार आहे तसेच कायदेशीर इलाजांचे बाहुल्य निर्माण होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. प्रतिवादी यांचे कथन पाहता, ते त्यांच्या स्वतःच्या मिळकतीमध्ये मुरुमीकरणाची परवानगी मागत नाहीत, ते शासकीय रस्त्यावर मुरुमीकरणाची परवानगी मागत आहेत. तथापी, शासकीय रस्ता मुरुमीकरण करणेची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था अथवा तत्सम शासकीय यंत्रणा यांची आहे. सदर शासकीय रस्त्याशी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा कोणताही संबंध नाही. त्यांचा त्यामध्ये कोणताही हितसंबंध गुंतलेला नाही. याही कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे संयुक्तिक वाटत नाही.

६. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.क्र.६५/१ सोबत मुख्याध्यापक, रेवनाळ हायस्कूल, रेवनाळ यांनी तहसिलदार, जत यांना दिलेले पत्र दाखल केलेले आहे. सदरचे पत्र हे मौजे रेवनाळ येथील ओलेकर वस्तीकडे जाणारा रस्ता शेतकऱ्यांनी बंद केला असल्यामुळे ओलेकर वस्तीवरील मुला मुलींना शाळेला येणे जाणेस गैरसोय होत असल्याबाबतचे आहे. तथापी, सदरचा रस्ता हा शासकीय रस्ता असून तो शेतकऱ्यांनी बंद केलेला आहे असे कथन पत्रामध्ये दिसून येत नाही. तसेच ६५/२ कडे काही

छायाचित्रे दाखल करुन वादी हे सदरचा रस्ता बंद करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापी, सदर छायाचित्राच्या पृष्ठयर्थ कोणताही सबळ पुरावा प्रतिवादी यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे, सदर छायाचित्रावरुन या घडीला कोणताही अनुमान काढता येणार नाही.

७. प्रतिवादी यांनी नि.६५/३ ते ६५/५ कडे शासन निर्णय व शुध्दीपत्रक दाखल केलेले आहेत. नि.६५/३ कडील शासन निर्णय हा, मोठे कृषी अवजारे यांचे वाहतुकीसाठी आणि शेतीमालाच्या जलद व सुरक्षित वहनासाठी पारंपारिक अरुंद शेतरस्त्याऐवजी रुंद शेतरस्ते उपलब्ध करुन देण्याबाबतचा आहे. तथापी, प्रस्तूत प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती ही भिन्न स्वरुपाची आहे. त्यामुळे, सदरचा शासन निर्णय हा प्रतिवादी यांना मदतीचा ठरु शकत नाही.

८. नि.६५/४ कडील शासन निर्णय हा मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरु करणे व ती राबविण्याकरिता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्याबाबतचा व नि.६५/५ कडील शुध्दीपत्रक त्याच शासन निर्णयाबाबतचा आहे. त्यातील निर्णयानुसार, शासन हे राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतामध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी इत्यादी कामासाठी तसेच शेतीमाल बाजारात पोहोचविण्यासाठी बारमाही शेतरस्ते आवश्यक असल्यामुळे असे रस्ते अधिक प्रभावीपणे सक्षम होण्याकरिता आणि त्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी विचाराधीन असल्याचे दिसते. तथापी, अशा रस्त्यांची कामे करण्यास ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद बांधकाम विभाग/उपविभाग, प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग, वनविभाग व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण इत्यादी यंत्रणांना प्राधिकृत केल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदरचा शासन निर्णय देखील प्रतिवादींना या कामी उपयोगी ठरत नाही.

९. सदर अर्जान्वये प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी शासकीय रस्त्यावर मुरुमीकरण करणेकरिता परवानगी मागितली आहे. सदर दाव्यातील मागणीच्या अनुषंगाने संबंधित अथोरिटी यांना पक्षकार केले आहे. परंतु, संबंधित अथोरिटीकडे मागणी केल्यावर त्यांनी रस्त्यावर मुरुमीकरण करण्यास नकार दिला यासंबंधाने कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी शासकीय रस्त्याचे मुरुमीकरण करण्याकरिता संबंधित अथोरिटीकडे मागणी केली होती व ती मागणी त्या अथोरिटीने नाकारली हे स्पष्ट होत नाही. अशा परिस्थितीत, सदरचा अर्ज कायदयाच्या चौकटीत नाही असे दिसते.

१०. वर चर्चिल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी प्रस्तूत अर्जाद्वारे केलेली मागणी ही दावा विषयाशी संबंधित नाही तसेच प्रतिवादींचा देखील शासकीय रस्त्याशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे, जर प्रतिवादींना शासकीय रस्त्याबाबत काही अनुतोष मिळवावयाचा असेल तर त्यांना त्याबाबत स्वतंत्र मंच उपलब्ध आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा अर्ज नामंजुरीस पात्र ठरतो. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.07.08 17:28:55 +0530

जत.
दिनांक–०८.०७.२०२६

(प्रकाश चु. बछले)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जत.

## प्रमाणपत्र

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | रफिक बा. समलेवाले, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जत. |
| आदेश घोषीत दिनांक | ०८.०७.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेला दिनांक | ०८.०७.२०२६ |
| आदेश अपलोड केलेला दिनांक | ०८.०७.२०२६ |